# 20 जानेवारी

## आजचा सुविचार :

शहाणा माणूस प्रत्येक वेळी एकांतात आणि कमजोर व्यक्ती नेहमी घोळक्यात दिसतो.

## आजचे पंचांग :

वार – गुरुवार

दिनांक : 20 जानेवारी 2022

तिथी – पौष

नक्षत्र – आश्लेषा

सुर्योदय – सकाळी 7.03 वाजता

सूर्यास्त सायंकाळी 6.23 वाजता

## आजचे दिनविशेष :

1999 : गिरीश कर्नाड यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर.

1960 : 19 वेळा माउंट एवरेस्ट सर करणारे नेपाळी गिर्यारोहक आपा शेर्पा यांचा मृत्यू.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Food – अन्न 2) Flag - झेंडा 3) Flower – फूल 4) Forest – जंगल

## आजची प्रश्नमंजुषा :

1) आपल्या गावातील सरकारी संस्थेंची नावे सांगा.

2) पाण्यामध्ये तरंगणाऱ्या वस्तूंची नावे सांगा.

3) आपल्या राष्ट्रगीता किती ओळींचे आहेत?

4) बंगालचा उपसागर भारताच्या कोणत्या दिशेला आहे?

## बोधकथा :

### दुधाचा पेला

एके दिवशी हरी शाळेतून घरी आला आणि त्याला खूप भूक लागली. त्याला माहीत होते कि आज आईने स्वयंपाक केलेला नाही. तो भुकेने व्याकूळ झाला आणि एका घरातून दुसऱ्या घरात जेवण मागू लागला. शेवटी एका मुलीने त्याला दुधाचा एक मोठा ग्लास दिला. जेंव्हा हरी पैसे देऊ लागला तेंव्हा तिने ते नाकारले. आणि त्याला परत पाठवले.

बऱ्याच वर्षांनंतर, ही मुलगी जी आता प्रौढा झाली होती, आजारी पडली. बऱ्याच डॉक्टरांना दाखवून ही तिच्या तब्येतीत काही फरक पडत नव्हता. शेवटी ती शहरातील नामवंत डॉक्टर सोबत, मोठ्या इस्पितळात गेली. डॉक्टरांनी काही महिने तिच्यावर उपचार केले आणि ती बरी झाली. ती खूप आनंदून गेली पण बिलाचे पैसे भारता येणार नाही हा विचार करून धास्तावली.

जेंव्हा हॉस्पिटलकडून तिच्या हातात बिलाचा लिफाफा आला तेंव्हा तिने तो उघडला त्यावर लिहिलेली अक्षरे होती, "रक्कम मिळाली, एका दुधाच्या पेल्यातून!"

तात्पर्य – चांगले काम कधीच वाया जात नाही.

Kitestudy.blogspot.com